**मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद पडलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या पुनरुज्जीवनाकरिता अनुदान वितरित करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
## शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१७/प्र.क्र.१३/पा.पु.१९(शिकाना)

जी.टी.हॉस्पीटल इमारत, ७ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
तारीख: ३१ मार्च, २०१८

**वाचा :-**

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक: ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७, दिनांक ०७ मे, २०१६

२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दिनांक १८.०४.२०१७

३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३ दिनांक ३०.०६.२०१७

**प्रस्तावना -**

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद पडलेल्या १८ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन करण्यास प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर १८ योजनांपैकी १७ योजनांची अंमलबजावणी महराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन या घटका करिता वित्त विभागाने रु. ८६.८२ लाख इतका निधी सुधारीत अंदाजाव्दारे उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र जिवन प्राधिकरणांकडील १७ प्रादेशिक योजनांच्या पुनरुज्जीवना करिता निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत राबविण्यात येणा-या १७ योजनांच्या अंमलबजावणी करिता रु. ८६,८२,०००/- ( रुपये शाऐंशी लाख ब्याऐंशी हजार फक्त ) इतका निधी संचालक वित्त, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यानां अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीव्दारे ( BEAMS) खालील अटींच्या अधीन राहून मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

**अटी -:**

१) सदर निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातच खर्च होणे आवश्यक आहे. तो व्यपगत होणार नाही अथवा कोषागारातून आहरित करुन बँक खात्यात काढून ठेवला जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वितरीत करण्यात आलेला निधी स्वीय प्रपंजी लेखा (PLA) किंवा अशा अन्य खात्या मध्ये ठेवण्यात येऊ नये.

३) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत निधी मागणी करतांना चालू आर्थिक वर्षात वितरित करण्यात आलेला निधी, झालेला खर्च, शिल्लक निधी इत्यादी बाबतची माहिती सादर केल्याशिवाय भविष्यात निधी मंजूर केला जाणार नाही.

४) ज्या प्रयोजनासाठी निधी वितरित करण्यात आलेला आहे, त्याबाबतची भौतिक प्रगतीची माहिती संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांच्या कडे दर महिन्यास मासिक खर्चाच्या अहवालासोबत सादर करावी. निधीच्या वाटपाचे लेखे, अभिलेख विहीत कार्यपध्दतीनुसार, अनुदान आहरीत व वितरीत करणा-या कार्यालयाच्या स्तरावर अद्ययावत ठेवण्यात यावे. त्याचप्रमाणे दर तीन महिन्यानी झालेल्या खर्चाची, महालेखाकार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करुन त्याबाबतचे विहित प्रमाणपत्र या विभागाकडे तात्काळ सादर करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता नियंत्रक अधिका-याने घ्यावी.

५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या अनुदानातून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत .या शासन निर्णयातील व दिनांक ७ मे,२०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीची व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पूर्तता होत आहे, याची खात्री करुन घेता यावी, या साठी महालेखापाल, महाराष्ट्र १/२ मुंबई / नागपूर यांना तसेच या विभागातील प्राधिकृत केलेल्या अधिका-यांना लेखा परिक्षणाकरिता संबंधीत अंमलबजावणी यंत्रणांची पुस्तके व लेखे पाहण्याचा अधिकार राहिल. तसेच महालेखापाल यांना त्यांचे काम योग्यरितीने पार पाडता यावे म्हणून संबंधीत अंमलबजावणी यंत्रणा संपूर्ण मदत व सुविधा पुरवतील.

६) अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व ताळमेळाचे अहवाल विहित दिनांकांना संबंधीत अंमलबजावणी यंत्रणांनी कार्यासन पापु-१९/पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करावे. त्याचप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालय, मुंबई / नागपूर व पापू-१९ कार्यासनास सादर करावे.

७) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच उक्त परिपत्रकान्वये आवश्यक असलेली प्रमाणपत्रे या विभागास सादर करण्यात यावीत.

या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना मुक्त करण्यात आलेला निधी रुपये ८६,८२,०००/- (रुपये शाऐंशी लाख ब्याऐंशी हजार फक्त ) बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संचालक, (वित्त) ) (श्री. सुधाकर डांगे ) यांच्या स्वाक्षरीने तयार केलेले व अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय ( श्री. का. जा. धलपे ) यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई यांना सादर करण्यात यावे. संचालक (वित्त) (श्री. सुधाकर डांगे ) यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच

अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय (श्री. का. जा. धलपे) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदरहू रक्कम एनईएफटी (NEFT) प्रणालीव्दारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या खाती जमा करण्यात यावी.

याबाबतचा खर्च मागणी क्र. वाय-२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा , १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, (०२) जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, (०२) (२७) बंद पडलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन (२२१५ ९९५१)- ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (दत्तमत) या लेखाशीर्षाखालील तरतुदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जुन, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटी व त्यासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र. ८ मधील अ.क्र. १ ते १० मधील आवश्यक त्या बाबींची पूर्तता होत आहे. परिशिष्टातील अ.क्र. १ ते ७ येथील अटींचा संबंध येत नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११५५४२७०५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

K. J. Dhalape

Digitally signed by K. J. Dhalape
DN: CN = K. J. Dhalape, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply And Sanitation Department
Date: 2018.03.31 18:44:20 +05'30'

**( का.जा. धलपे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई
४) महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र २, नागपूर
५) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई-२१,
७) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई
८) मुख्य/ अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
९) कार्यासन पापु-०४ व पापु-२० पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय
१०) निवड नस्ती पापु-१९